Page :
Date :

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज

# इतिहास विभाग

ग्रुप क्र - ५

पेपर नं 13

COMMERCE COLLEGE
Tal. Khatav
Dist. Satara
(M.S)

R-516

2016-17

भक्ती चळवळ

# गटातील विद्यार्थी

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | रोल नं | सही |
|---|---|---|---|
| 1. | कु. मुल्ला शाहरुख मजरअल्ली | 568 | [signature] |
| 2. | कु. मुलाणी आसमा गनिभाई | 569 | A.G. Mulani. |
| 3. | कु. नलवडे विशाखा बाळासो | 570 | |
| 4. | कु. निंबाळकर गौरी लालासाहेब | 571 | G. L. Nimbalkar |
| 5. | कु. पवार पुजा सुखदेव | 572 | P.S. Pawar. |
| 6. | कु. पवार वैशाली बाळासो | 573 | VPawar |
| 7. | कु. पाटोळे अक्षय संजय | 574 | APatole |
| 8. | कु. पाटोळे रुपाली दत्तात्रय | 575 | R.D. Patole |

पर्यवेक्षक
प्रा. घार्गे आर. एम.
प्रा. गुजर व्ही. बी

सन 2016-17

B
R-516

Scanned with CamScanner

Page :
Date

# अनुक्रमणिका


| अ.न. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 1 |
| 2 | ऋण निर्देश | 2 |
| 3 | उद्दिष्ट्ये | 3 |
| 4 | गृहितके | 4 |
| 5 | भक्ती चळवळीचा उदय | 5 |
| 6 | भक्तीचे स्वरुप | 6 |
| 7 | वैष्णव व शैव पंथांचा उगम | 7 |
| 8 | भारतातील भक्तीपंथ | 8 |
| 9 | द. भारतातील संप्रदाय | 11 |
| 10 | महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय | 12 |
| 11 | कर्नाटकातील भक्ती संप्रदाय | 15 |
| 12 | भक्तीचे चळवळीचे महत्त्व | 17 |
| 13 | आभार | 18 |


B
R-516

Scanned with CamScanner

# प्रस्तावना

देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासात भक्ती चळवळीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या चळवळीला मोठा इतिहास आहे देशभर या चळवळीचा विस्तार झाला आजही महाराष्ट्रात लाखो लोक अगदी भक्तीभावाने त्यात सामिल होत आहेत. वर्षातून किमान दोन वेळा आषाढी आणि कार्तिकी एकादशीला लाखोंच्या संख्येने या भक्ती चळवळीत सामिल होवून भक्तीभावाने पंढरपूरला देवाच्या दर्शनाला जातात. या चळवळीचा धार्मिक, सांस्कृतिक प्रभाव महत्त्व पटते. त्या भक्तांना वारकरी असेही म्हणतात

मानवी जीवनात धर्म, परमेश्वर व परमेश्वराची भक्ती यास विशेष महत्त्व आहे भक्ती हा हिंदू धर्मीयांचा स्वाभिमान आहे भक्ती चळवळीत प्राचीन काळापासून अनेक संतांनी मोलाचे कार्य केलेले असून वेगवेगळ्या नावाने कार्यरत असलेले किंवा परमेश्वराचा नामोच्चार करीत. एक प्रकारे समाजसेवा करीत असलेले अनेक पंथ किंवा संप्रदाय असून देशाच्या सर्व भागात ही चळवळ प्रसार पावलेली दिसते.

# ऋणनिर्देश

आम्ही आपल्या कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज येथे B.A - III (इतिहास विभाग) (सन 2016-17) या वर्गात शिकत असून इतिहास विषयाअंतर्गत असलेले "भक्ती चळवळ" हे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करत असताना आम्हाला आमचे विषय शिक्षक प्रा. श्री. व्ही. बी. गुजर व प्रा. श्री. आर. एम. घार्गे यांनी योग्य मार्गदर्शन केले तसेच प्राचार्य एल. जी. जाधव यांनी देखील बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल गट क्र- 4 ची गटप्रमुख या नात्याने आमच्या गटातील सर्व विद्यार्थीमार्फत मी कुमारी पाटोळे रुपाली दत्तात्रय आपणा सर्वांचे मनापासून आभार मानतो आम्ही सर्वजण त्यांचे ऋणी आहोत.

Page : 5
Date :

# उद्दिष्टये

आपणास या प्रकल्पामधून मध्ययुगीन भारताची भक्ती चळवळीविषयी माहिती मिळते

आपणास या प्रकल्पामधून मध्ययुगीन भारतात भक्तीसंप्रदाय त्यामध्ये वारकरी, धारकरी, दत्तात्रय संप्रदाय याविषयी माहिती मिळते

भक्तीचे स्वरुप समजू शकेल

महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायाचे कार्य सांगता येईल

वैष्णव भक्ती व प्रादेशिक विविधतेची माहिती घेता येईल

भक्ती चळवळीचे महत्व लक्षात येईल

Scanned with CamScanner

Date : ____________

# गृहितके

1) आपणास या प्रकल्पामधून भक्ती चळवळीविषयी माहिती मिळते

2) इतिहासात असे प्रकल्प केल्याने भक्ती चळवळी विषयी सर्वांना माहिती मिळते

3) आपणास या प्रकल्पामधून इतिहासाविषयी ज्ञान मिळते

4) आपणास या प्रकल्पामधून सर्व इतिहासकालीन माहिती मिळते

5) आपणास या प्रकल्पामधून विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाच्या अभ्यासाची रुची निर्माण करण्यास मदत होते

Scanned with CamScanner

# भक्ती चळवळीचा उदय

मोक्षप्राप्तीच्या कल्पनेने किंवा हेतूने केलेली परमेश्वराची पूजा, आराधना म्हणजे भक्ती होय. हिंदुस्तानातील सिंधू संस्कृतीच्या कालखंडापर्यंत भक्तिपंथ प्राचीन आहे त्याकाळात असे अवशेष मिळतात की, भगवान शिव, पशुपती ध्यानस्थ बसले असून त्यांच्या भोवताली पशु आहेत वेद, उपनिषदे महाकाव्ये व पुराणात भक्तीचा उल्लेख आहे.

भक्ती चळवळीचा उदय आणि विकासाचा विचार करता प्राचीन काळातील शंकराचार्यांचे कार्य खूप महत्त्वाचे ठरते. इ. स. 788 ते 820 हा त्यांचा केवळ 32 वर्षांचा कालखंड होय. दक्षिणेतील मलबार येथील नम्बुद्री ब्राम्हण म्हणजे शंकराचार्य होत ते मूळचे शिवभक्त होय. ते अत्यंत हुशार असून ते सन्यासी होते. त्यांनी धर्मग्रंथांचा सखोल अभ्यास केला. काशी येथे त्यांना गुरु गोविंद योगी यांचे मार्गदर्शन लाभले

शंकराचार्य यांनी देशाच्या सांस्कृतिक संघटनेसाठी त्यांनी जगन्नाथपुरी, शृंगेरी (दक्षिण) द्वारका (पश्चिम) बद्रिनाथ (उ. भारत) येथे मठांची स्थापना केली आजही आपणाला तीर्थस्थळांचे महात्म्य प्रचीतिस येते.

# शैव व वैष्णव पंथाचा उगम

शिव व विष्णू या देवतांच्या नावे शैव व वैष्णव पंथ उदयास आले. शिव म्हणजे शंकर होय ऋग्वेदामध्ये शिवाचा उल्लेख नाही वेदोत्तर काळामध्ये वादळी देव, पशुपती, प्राण्यांचा प्रतिपाळ करणारा देव म्हणून उल्लेख आढळतो. उपनिषदांमध्ये शिवाला सर्वोच्च परमेश्वर असे समजण्यात आले आहे. शिवाची मुर्ती व लिंगास्वरुपात पुजा केली जाते. महाराष्ट्रात गावागावात शिवमंदिरे पहावयास मिळतात

वैदिक वाङ्‌मयातून विष्णू या देवतेची माहिती मिळते. विष्णूस सुपिकता व उत्पादकता याची देवता मानली जाते विष्णूचे दशावतार प्रसिद्ध आहेत त्यातील राम व कृष्ण या अवताराला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. महाभारतामध्ये कृष्णाचे विष्णूशी एकात्म दाखविले आहे. छांदोग्योपनिषदामध्ये कृष्ण हा देवकीचा पुत्र असल्याचे सांगितले आहे.

Page : 8
Date :

# अ) भारतातील भक्तीपंथ

- संत रामानंद
  - संत कबीर
- वल्लभाचार्य
  - मीराबाई
- तुलसीदास

## संत रामानंद

रामानंद हे रामानुजाचार्यांचे शिष्य होते १४ व्या शतकात त्यांनी उ. भारतात भक्तीपंथाची मुहूर्तमेढ रोवली ते म्हणतात. रामभक्तीचा महिमा त्यांनी वाढीस लावला एकेश्वरवाद, परमेश्वराची सर्व व्यापकता आणि गुरुची महत्ता. या उपदेशावर भर दिला रामानंदांनी सुरु केलेल्या भक्तीपंथातून अनेक शाखा सुरु झाल्या त्यापैकी कबीराचा समन्वयवादी पंथ व तुलसीदासाचा सनातनी पंथ प्रमुख होत.

## संत कबीर

इ.स. १३९८ मध्ये कबीराचा जन्म एका ब्राम्हण कुटुंबात झाला लहानपणीच त्यांच्या आईवडिलांनी त्यास सोडून दिले त्यांचा सांभाळ एका नीरु जुलाहिने (विणकर) याने केला याने आपले आयुष्य काशिमध्ये घालविले या भागास कबीर चौरा असे म्हणतात कबीर म्हणतात. प्रेम व भक्तीच्या माध्यमातून मोक्ष प्राप्ती होते वेकल्ये कर्मकांड, मूर्तिपूजा यांचे कबीरांनी खंडन केले कबीर जसे संत होते तसेच ते प्रासादिक कवीही होते कबीरांचे दोहे प्रसिद्ध आहेत.

## वल्लभाचार्य

इ.स. 1448 ते 1530 हा वल्लभाचार्यांचा काळ होय. ते कृष्ण भक्त होते उ. भारतात पुष्टीमार्ग प्रसिद्धीस आला त्याचे वल्लभाचार्य संस्थापक होते पुष्टीमार्गात राधा-कृष्ण उपासनेला महत्व आहे उत्तरे प्रमाणेच गुजरात राजस्थानमध्ये पुष्टीमार्ग प्रसिद्धीस आला. अनेक राजेरजवाड्यांनी पुष्टीमार्गाचा अवलंब केला वल्लभाचार्य विजयनगरच्या राजा यांच्या दरबारी आहे. त्यानंतर ते तीर्थक्षेत्र काशी येथे स्थिर झाले. कृष्णाला ते परब्रम्ह स्वरूपात पाहतात

पुष्टीमार्गाच्या प्रसारासाठी वल्लभाचार्यांनी संस्कृत ग्रंथरचना केली त्यांचे साहित्य जनमानसात अत्यंत लोकप्रिय आहे.

## मीराबाई

भारतातील श्रेष्ठ स्त्री भक्तांमध्ये मीराबाईचा नामोल्लेख केला जातो मीराबाई कृष्णभक्त होती रजपूत राजकन्या असणाऱ्या मीराबाईचा विवाह झाला पण संसारिक जीवनात, ईश्वराशिवाय ती रमली नाही कृष्ण उपासनेसाठी तिने आपुले आयुष्य खर्ची घातले तिने मथुरेला बराच काळ वास्तव्य केले मीराबाईंनी राजस्थानी व्रज व गुजराती भाषेमध्ये भक्तीपदे रचली ती अत्यंत लोकप्रिय आहेत.

Page : 10
Date :

# तुलसीदास

इ.स. 1532 ते 1623 हा तुलसीदासांचा कालखंड होय. तुलसीदास यांचा जन्म 1532 मध्ये. उ प्रदेशातील बांदा जिल्ह्यात राजापूर येथे एक ब्राम्हण कुटुंबात झाला. अशुभ वेळी जन्म झाला. म्हणून तुलसीदासांच्या आई-वडिलांनी त्यांचा त्याग केला. पोरक्या झालेल्या तुलसीदासाचे बालपण अत्यंत हालाखीत गेले. त्यांनी तीर्थस्थळांना भेटी दिल्या. रामानंद शिष्य नरहरीदास यांनी तुलसीदासांना भक्तीपंथाची दिक्षा दिली.

ईश्वराची उत्कट भक्ती करा त्यातून भवसाक्षात्कार घडेल असे तुलसीदास सांगतात ते म्हणतात माझे हृदय म्हणजे ईश्वराचे निवासस्थान आहे. भक्ताबद्दल त्यांना नितांत आदर होता ते म्हणतात रामाचे दास हे रामापेक्षा मोठे होते भक्तीचे नऊ प्रकार सांगण्यात आले आहेत

1. श्रवण – ईश्वराचे श्रवण करणे
2. किर्तन – ईश्वराचे गुणगाण करणे
3. स्मरण – ईश्वराचे सतत स्मरण करणे
4. पादसेवन – ईश्वराच्या समीपजाणे
5. अर्चन – ईश्वरास नम्रतेने वंदन करणे
6. दास्य – ईश्वराच दास बनणे
7. सख्य – ईश्वर आणि भक्त यांच्यात सख्य निर्माण करणे ईश्वराशी एकरूप होणे.
8. आत्मनिवेदन – भक्त ईश्वरास वंदन करणे
9. वंदन – नम्रपणे ईश्वरास वंदन करणे

अशा प्रकारे या मार्गाने भक्त ईश्वराची प्राप्ती करू शकतो

B R-511

# ब) द. भारतातील संप्रदाय

रामानुजाचार्य — वल्लभाचार्य

## रामानुजाचार्य

12 व्या शतकात त्यांचा जन्म झाला द. भारतात भक्ती आंदोलनाची चळवळ त्यांनी उभी केली. रामानुजाचार्य हे विष्णूची उपासना करत. योग्य वेळी विष्णू मानवी रूपात भूतलावर अवतार घेतो अशी त्यांची धारणा होती.

रामानुजाचार्यांच्या अनुयायांमध्ये दोन पंथ आकारास आले त्यात तेंगलाई हा दक्षिणेतील पंथ तर वडगलाई हा उत्तरेकडील पंथ होय. दक्षिणेतील तेंगलाई पंथाचे लोकाचार्य हे प्रचारक तर उत्तरेकडील वडगलाई पंथाचे वेदांत देशिका हे प्रचारक होते.

## वल्लभाचार्य

वैष्णव पंथाचे शेवटचे आचार्य म्हणून वल्लभाचार्यांना ओळखले जाते 15 व्या व 16 व्या शतकात दक्षिण भारतभर भक्तीसंप्रदाय त्यांनी वाढीस लावला. पुष्टीभक्तीस त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले पुष्टीभक्ती म्हणजे भक्ताने पुष्टी मिळवणे भक्तीने ईश्वरकृपा प्राप्त करणे ज्ञानापेक्षा भक्ती श्रेष्ठ असल्याचे वल्लभाचार्य म्हणतात



Scanned with CamScanner

Page : 12
Date :

## क) महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय

महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाने अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे मध्ययुगीन महाराष्ट्रात चार भक्तिसंप्रदाय उदयास आले त्याची दैवते व आचार्य धर्म तत्त्वज्ञान यात फरक होता मात्र सर्वांनीच भक्तीला अनन्यसाधारण स्थान दिले

महानुभाव भक्तिसंप्रदाय : आराध्य दैवत कृष्ण
वारकरी भक्तीसंप्रदाय : आराध्य दैवत विठ्ठल
धारकरी भक्तीसंप्रदाय : आराध्य दैवत राम
दत्तात्रय भक्तीसंप्रदाय : आराध्य दैवत दत्तात्रय

## महानुभाव भक्तिसंप्रदाय

या पंथाची स्थापना गोविंदप्रभू यांनी केली. मध्ययुगीन महाराष्ट्रातील हा पहिला संप्रदाय होय. कृष्ण हे महानुभाव संप्रदायाचे आराध्य दैवत होय. भगवतगीता या पंथाचा पवित्र ग्रंथ होय चक्रधरस्वामींनी महानुभव पंथाला तात्विक बैठक प्राप्त करून दिली

म्हाइंभट यांनी लिहिलेला लीळाचरित्र ग्रंथ म्हणजे चक्रधरस्वामींचे जीवन चरित्र आहे लीळाचरित्राबरोबरच केशिराज यांचा सूत्रपाठ नरेंद्र्यां रुक्मिणीस्वयंवर आणि कवियत्री महदंबेचे धवळे महानुभाव पंथियांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ होत.

B

R-511

# वारकरी संप्रदाय

संत ज्ञानेश्वरांपासून वारकरी संप्रदायाची सुरुवात केली भक्तीमार्गाचा अवलंब करुन त्यांनी समाजाचा ऐक्य वाढीस लावण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या (भावार्थदीपिका) माध्यमातून भगवदगीतेतील महत्वाचे तत्वज्ञान त्यांनी मराठीतून सांगितले ज्ञानेश्वर म्हणतात, " ईश्वरावर श्रद्धा ठेवली सगळ्यांशी समतेने वागा दुखी माणसांना मदत करा व लोकांचे दु:ख नाहीसे करा". वारकरी संप्रदायाला तात्विक बैठक प्राप्त करुन देण्याचे काम ज्ञानेश्वरांनी केले.

वारकरी आषाढी व कार्तिकी शुद्ध एकादशीला पंढरपूरला जातात पंढरपूरचा विठ्ठल हे त्याचे आराध्य दैवत होय. सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती ही वारकऱ्यांची तत्वप्रणाली होय. कर्मकांड, व्रतवैकल्ये, अंधश्रद्धा यांना थारा न देता वारकऱ्यांनी भजन-किर्तन ध्यानधारणेवर भर दिला. संत तुकाराम यांच्या कालखंडात वारकरी संप्रदाय कळसास जाऊन पोहचला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जिवनात वारकरी संप्रदायाचे कार्य अत्यंत महत्वपूर्ण आहे.

R-511

Page : 16
Date :

# धारकरी संप्रदाय

धारकरी संप्रदायाची स्थापना समर्थ रामदासांनी केली 'श्री राम' हे धारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत होय. श्रीरामाच्या उपासनेचे महत्त्व समर्थांनी विशद केले चाफळ येथे राममंदिराची स्थापना केली. गावोगावी मारुतीची मंदिरे स्थापन करून तरुणांना बलोपासनेचा संदेश दिला. भक्तीच्या माध्यमातून आत्मसाक्षात्कार होतो असे धारकरी मानतात प्रतिमा, अवतार, आत्मा व परमात्मा ही एकाच परतत्त्वाची रुपे असल्याचे धारकरी समजतात

# दत्तात्रय संप्रदाय

ब्रम्हा-विष्णू-महेश या तीन्ही देवतांची एकत्रित मुर्ती म्हणजेच दत्त होय. दत्त हे या पंथाचे मुख्य दैवत होय. औदुंबर, नृसिंहवाडी हे दत्तसंप्रदायाची तीर्थक्षेत्रे मानली जातात तर कर्नाटकामध्ये गाणगापूर, कुरवपूडी ही तीर्थक्षेत्रे होत. या संप्रदायात पादुका पूजेला महत्त्व आहे श्रीगुरुचरित्रपठणाला दत्तसंप्रदायींनी महत्त्व दिले आहे मार्गशीर्ष पौर्णिमेस दत्तजयंती उत्सव साजरा केला जातो.

# ३) कर्नाटकातील भक्तीसंप्रदाय

## १) वीरशैव पंथ

वैदिक काळापासून वीरशैव पंथ कार्य करतो आहे 12 व्या शतकात बसवेश्वरांनी आपल्या पुरोगामी कार्यास सुरुवात केली. बसवेश्वरांनी वर्ग व जात या विरुद्ध आघाडी उघडली. वीरशैव पंथामध्ये गुरुला महत्त्वाचे स्थान आहे या पंथीयांना लिंगायत म्हणून ओळखले जाते ज्याने हा पंथ स्विकारला आहे त्यास स्वतः जवळ एक लिंग ठेवावे लागते

वीरशैव पंथामध्ये 'पंचाचार' ही त्यांची आचारसंहिता होय यामध्ये लिंगाचार, सदाचार शिवाचार, भृत्याचार व गणाचार यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे 'अष्टावरण' हा त्यांचा आचार धर्म होय.

## २) कर्नाटकातील दासकुट

दासकुट म्हणजे परमेश्वराच्या सेवकांची बैठक असा अर्थ होतो. मध्वाचार्यांनी वेदान्तजन्य वस्तुनिष्ठ तत्वज्ञान पुरस्कारिले पुढील काळात याचा मोठा प्रभाव पडला दासकुटामध्ये त्यांचे संस्थापक श्रीपादराज, व्यासराज कनकदास व पुरंदरदास यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

Page : 18
Date :

## ३) पुरंदरदास

१६ व्या शतकात कर्नाटकात वैष्णव पंथाच्या प्रसाराचे महत्त्वाचे कार्य पुरंदरदासांनी केले. त्यांनी अनेक भक्तीकवने लिहली आहेत ती प्रेम भक्ती व त्याग यांनी ओतप्रोत भरलेली आहेत समाजाला भक्तीची शिकवण देणाऱ्या दासकूट संप्रदायातील महत्त्वपूर्ण संत म्हणून पुरंदरदास यांचा उल्लेख केला जातो त्यांच्या प्रमाणेच जगन्नाथ दास यांनी कानडी भाषेत लिहिलेला 'हरिकथामृतसार' हा ही महत्त्वपूर्ण ग्रंथ होय

# बंगालमधील भक्तीसंप्रदाय

बंगाली वैष्णव पंथाचा उदय माधवेंद्र गोस्वामी यांनी केला. भागवत, श्रीकृष्णकर्णामृत, ब्रम्हसंहिता या ग्रंथावर बंगाली वैष्णव पंथाच्या तत्त्वज्ञानाची बैठक अवलंबून आहे या पंथामध्ये ईश्वरपुरी, कृष्णचैतन्य हे महत्त्वाचे संत होऊन गेले.

# भक्ती चळवळीचे महत्व

हिंदुस्थानमधील मुळच्या हिंदू धर्म व इस्लामाच्या आक्रमणाबरोबर भारतात आलेला सुफी पंथ यांचा परस्पर संबंध आला एकमेकांचा परस्परावर गोठाकार प्रभाव पडला दोन्ही धर्मामध्ये अनेक बाबतीत सारखेपणा आहे. उपनिषदातील अद्वैतवाद आणि इस्लामचा एकेश्वरवाद वीरशैव पंथातील षट्स्थलसिद्धांत आणि सुफी पंथातील सात मुक्काम

हिंदू व मुस्लिम / इस्लाम यांचा परस्परावर किती प्रभाव पडला याबाबत विचारवंतामध्ये मतभेद आहेत काही विचारवंत असे म्हणतात की, जातीयता व विषमता असणाऱ्या हिंदुस्तानात इस्लामने विश्वबंधुत्वाचा संदेश आणला. परंतु हा संदेश फक्त इस्लाम धर्मीयांपुरता सिमित होता हिंदुचा 'काफर' म्हणून तिरस्कार केल्याचा त्याच्यावर सिसिया आकारल्याचा व धर्मसक्ती केल्याचे इतिहासाचे अनेक दाखले आहेत.

मध्ययुगीन हिंदुस्थानच्या इतिहासात भक्ती आंदोलना-आंदोलनाचे योगदान महत्वपूर्ण आहे या आंदोलना मुळे प्रांती भाषा व साहित्याचा विकास झाला हिंदी, मराठी, कन्नड, तामिळ, बंगाली इ. भाषेत विपुल व दर्जेदार साहित्याची निर्मिती झाली या आंदोलनाने हिंदु मुस्लीम ऐक्याचा पाया घालण्याचे काम केले.

# आभार

2016-17 या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यातील बी.ए. भाग 3 या वर्षासाठी इतिहास अभ्यास या विषयांतर्गत विषय प्रकल्प करण्याची संधी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी उपलब्ध करून दिली त्याबद्दल शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांची मी ऋणी आहे

विषय प्रकल्प करीत असताना विषय निवडीचे स्वातंत्र्य, प्रत्येक प्रश्नासाठी योग्य मार्गदर्शन व सातत्याने प्रोत्साहन दिल्याबद्दल मा. प्राचार्य श्री जाधव. एल. जी यांची मी आभारी आहे.

या विषय प्रकल्पादरम्यान योग्य मार्गदर्शन करणारे आणि पूरक माहिती देणारे व्ही. बी. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक ती माहिती देणारे प्रा. घार्गे आर. एम. यांनीही दिली. तसेच आवश्यक ती माहिती देणारे विषय क्षेत्रातील सहकारी यांचे आम्ही मनापासून आभारी आहे.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय वर्ग यांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

Scanned with CamScanner